दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


**परळीत शिंदे गटाच्या माजी तालुकाप्रमुखांचा मृत्यु**

परळी : बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख शिवाजीराव शिंदे यांच्या मृत्यूची घटना समोर आली असून, राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दादाहरी वडगाव येथील रहिवासी असलेल्या शिवाजीराव शिंदे यांचा त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार त्यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शिवाजीराव शिंदे हे परळीतील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात परिचित होते.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### फडणवीस सरकारच्या अर्थकारणाचा फज्जा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याच्या हप्त्यासाठी अनुसूचित जाती घटकासाठी असलेल्या निधीतून ३३९ कोटी १४ लाख रुपये महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. २४ सप्टेंबर २०२६च्या शासन निर्णयानंतर समोर आलेल्या या निधीवाटपामुळे राज्य सरकारच्या आर्थिक नियोजनावर आणि सामाजिक न्यायाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. हा निधी पात्र अनुसूचित जाती घटकातील महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यासाठी वापरला जाणार आहे.

मुळात सामाजिक न्याय विभागाचा निधी अनुसूचित जातींच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी विविध योजनांवर खर्च होणे अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत लाडकी बहीण योजनेचा आर्थिक भार भागवण्यासाठी याच विभागाचा निधी वळवावा लागत असेल, तर राज्याच्या अर्थसंकल्पीय नियोजनाची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

विशेषतः अर्थमंत्री म्हणून अजित पवारांकडे असलेल्या वित्त व्यवस्थापनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने लोकप्रिय योजनेसाठी दीर्घकालीन आणि स्वतंत्र आर्थिक तरतूद का सुनिश्चित केली नाही, याचे स्पष्टीकरण अपेक्षित आहे.

खरा प्रश्न आता अनुसूचित जाती विभागासमोर आहेत्यांच्या नियोजित कल्याणकारी योजनांसाठी मंजूर निधी कमी पडणार नाही, याची सरकार हमी देणार का? सामाजिक न्यायाच्या योजनांचा निधी वळवल्यानंतर त्या योजनांची अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची जबाबदारी कोण घेणार? महिला लाभार्थ्यांना हप्ता देणे महत्त्वाचे आहेच; पण एका कल्याणकारी गटाचा हक्क दुसऱ्या गटाच्या निधीतून भागवला जात नाही ना, याचे पारदर्शक उत्तर सरकारला द्यावे लागणार आहे.

# व्यासपीठावरचा अधिकार, न्यायालयातली कसोटी!

## सरन्यायाधीशांचे शब्द आश्वासक; पण प्रश्न एवढाच न्यायालयाच्या दारात आलेल्या प्रत्येक आंदोलनाला हीच हमी मिळणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

पाटण्यातील चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठात सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विधी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. आंदोलन दडपण्याचा बेकायदेशीर प्रयत्न झाला तर न्यायालय डोळे झाकून बसणार नाही, असे त्यांनी सांगितले. लोकशाहीच्या दृष्टीने ही भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे. कारण लोकशाहीचे खरे सौंदर्य सत्तेच्या निर्णयांवर टाळ्या वाजवण्यात नसते; तर त्या निर्णयांवर प्रश्न विचारण्याची मुभा असण्यात असते.

पण इथेच एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो हा सिद्धांत केवळ विद्यार्थ्यांशी संवाद साधताना उच्चारला जाणारा आश्वासक विचार आहे की न्यायालयीन कामकाजातही त्याच कठोरपणे लागू होणारी कसोटी?

हा प्रश्न अनाठायी नाही. जुलैमध्ये जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलनासंदर्भातील सुनावणीदरम्यानही सरन्यायाधीशांच्या खंडपीठाने शांततापूर्ण आंदोलन घटनात्मक संरक्षणाखाली असल्याचे म्हटले होते. केवळ आंदोलन सुरू आहे म्हणून लाठीचार्जचे समर्थन होऊ शकत नाही आणि पोलिसांकडून झालेल्या कथित अतिरेकाची स्वतंत्र तपासणी झाली पाहिजे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते.

म्हणजेच प्रश्न केवळ आजच्या पाटणा व्याख्यानाचा नाही. प्रश्न आहे भूमिकेच्या सातत्याचा.

एखादा नागरिक सरकारविरोधात आंदोलन करतो, एखादा विद्यार्थी विद्यापीठाच्या निर्णयाविरोधात आवाज उठवतो किंवा एखादा समूह प्रशासनाच्या धोरणावर प्रश्न उपस्थित करतो तेव्हा त्याचा आवाज 'कायदा-सुव्यवस्था' या चौकटीत अडकवला जातो. त्यानंतर पोलिसी कारवाईचे समर्थन करण्यासाठी अनेक कारणे पुढे केली जातात. अशा वेळी न्यायालयाची भूमिका नेमकी किती स्वतंत्र, किती तत्पर आणि किती समान राहते, हा लोकशाहीसाठी मूलभूत प्रश्न आहे.

विशेषतः जेव्हा प्रश्न सत्ताधारी यंत्रणा विरुद्ध सामान्य नागरिक असा असतो, तेव्हा न्यायालयाच्या शब्दांपेक्षा त्याच्या आदेशांकडे जनता अधिक बारकाईने पाहते.

आणखी एक महत्त्वाचा संदर्भ म्हणजे छ‍अड्डअठ प्रकरण. विद्यार्थ्यांनी उगखंच्या विद्यापीठातील कार्यक्रमाविरोधात शांततापूर्ण भूमिका घेतल्यानंतर इउखकडून त्यांच्या नोंदणीवर कारवाईची दिशा देण्यात आली होती. नंतर ती मागे घेण्यात आली आणि सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराबाबत प्रश्न उपस्थित केले.

म्हणूनच आज सरन्यायाधीशांनी केलेल्या विधानाचे स्वागत करतानाच एक प्रश्न विचारणे आवश्यक आहेउद्या एखाद्या सरकारी धोरणाविरोधात हजारो विद्यार्थी न्यायालयाच्या दारात उभे राहिले, तर त्यांच्याकडे पाहण्याची हीच संवेदनशीलता न्यायालयीन प्रक्रियेतही दिसेल का?

आणि त्याहून कठीण प्रश्न न्यायालयावरच एखाद्या शक्तिशाली यंत्रणेचा दबाव असल्याची शंका निर्माण झाली, तर न्यायालय स्वतःचे स्वातंत्र्य कसे सिद्ध करणार?

लोकशाहीत न्यायपालिकेवर 'कोणाची सावली आहे' असा प्रश्न निर्माण होणेही धोकादायक असते. त्याचे उत्तर भाषणातून नव्हे, तर प्रत्यक्ष निर्णयांतून मिळते.

सरन्यायाधीशांनी कॉलेजियमच्या गोपनीयतेचे समर्थन करताना न्यायाधीशांच्या प्रतिष्ठेचे आणि स्वाभिमानाचे संरक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. हा मुद्दाही न्यायपालिकेच्या स्वायत्ततेशी जोडलेला आहे. परंतु गोपनीयता आणि पारदर्शकता यांच्यातील संतुलन हा सार्वजनिक विश्वासाचा विषय आहे. अंतर्गत चर्चा गोपनीय ठेवण्याचे कारण न्यायाधीशांना मुक्तपणे मत मांडता यावे हे असेल, तर अंतिम निर्णयांमध्ये न्यायिक स्वातंत्र्य, कारणमीमांसा आणि घटनात्मक मूल्ये अधिक स्पष्ट दिसणे अपेक्षित ठरते.

शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार अबाधित ठेवण्याची हमी ही केवळ सुंदर घोषणा राहू नये. ती पोलिसांच्या लाठीसमोर, सरकारी आदेशासमोर आणि न्यायालयाच्या दारातही तितकीच प्रभावी दिसली पाहिजे.

कारण शेवटी लोकशाहीचा खरा प्रश्न हा नाही की न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांना काय सांगितले.

खरा प्रश्न हा आहे

जेव्हा विद्यार्थी न्यायालयाच्या बाहेर प्रश्न विचारत उभे राहतील, तेव्हा न्यायालय त्या प्रश्नांकडे किती उघड्या डोळ्यांनी पाहणार?

# आज बँक अधिकाऱ्यांना दिलासा; उद्या चोक्सीला?

## पीएनबी घोटाळ्यात छउड‍ढचा निर्णय; तपासातील जबाबदारीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मुंबईतील राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाने (NCLT) पंजाब नॅशनल बँकेच्या घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या काही मालमत्तांवरील जप्ती उठवली आहे. माजी कार्यकारी संचालक संजीव शरण यांना कंपनी याचिकेतून वगळताना त्यांच्या भूमिकेबाबत उपलब्ध पुराव्यांत थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग दर्शवणारे पुरेसे साहित्य नसल्याचे न्यायाधिकरणाने नमूद केले. मात्र, पुढे नवे पुरावे समोर आल्यास ही निरीक्षणे अंतिम निष्कर्ष मानली जाऊ नयेत, असेही NCLTने स्पष्ट केले आहे.

न्यायालयीन प्रक्रियेत एखाद्या व्यक्तीविरुद्ध पुरावा अपुरा ठरल्यास त्याला दिलासा मिळणे हा कायद्याचा स्वाभाविक भाग आहे. त्यामुळे या निर्णयाला थेट 'घोटाळ्यातून निर्दोष मुक्तता' असे म्हणणे योग्य ठरणार नाही. उलट, NCLTने तपास आणि जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया काही बाबतीत सुरूच ठेवली आहे. पण या निर्णयाने एक मोठा सार्वजनिक प्रश्न मात्र उभा राहतो. PNBच्या हजारो कोटींच्या कथित घोटाळ्यात यंत्रणेतील त्रुटी होत्या, निष्काळजीपणा होता की कोणाचा हेतुपुरस्सर सहभाग होतायाचा अंतिम हिशेब कधी लागणार? चोक्सी आणि नीरव मोदी यांच्याशी संबंधित प्रकरणात तपास यंत्रणांनी यापूर्वी अनेक मालमत्ता जप्त केल्या आहेत. चोक्सीशी संबंधित मालमत्तांवरही E¦ने कारवाई केली असून, तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार या प्रकरणात बँकेला मोठा आर्थिक तोटा झाला. म्हणूनच आजचा NCLTचा निर्णय पाहताना उद्याच्या न्यायालयीन प्रक्रियेबाबत प्रश्न विचारला जाणे स्वाभाविक आहेजर बँकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत पुरावे अपुरे ठरू शकतात, तर मुख्य आरोपींविरुद्धचा खटला कोणत्या पुराव्यांच्या आधारे आणि किती वेगाने निर्णायक टप्प्यावर पोहोचणार? याचा अर्थ मेहुल चोक्सीला उद्या दिलासा मिळेल, असा निष्कर्ष काढता येत नाही. तसाच कोणत्याही आरोपीला दोषी ठरवण्यापूर्वी न्यायालयीन पुरावे आवश्यक आहेत. पण प्रश्न मोदी सरकारच्या काळातील तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर नक्कीच उपस्थित होतोघोटाळा उघडकीस आल्यानंतर मालमत्ता जप्त करणे सोपे; मात्र दोष, जबाबदारी आणि अंतिम शिक्षा निश्चित करणे इतके कठीण का?

# राम मंदिर देणगी चोरीचा आरोप; ६७ जणांचा सहभाग?

## बाथरूममधून थेट २.२५ लाखांची रोकड जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अयोध्या : अयोध्येतील राम मंदिराच्या देणगी मोजणीतील कथित चोरीप्रकरणी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. तपासानुसार, देणगी मोजणीच्या खोलीत अनेक दिवस चोरी होत असल्याचा संशय असून, या प्रकरणात तब्बल ६७ जणांचा सहभाग असल्याचे आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. मात्र, ही संख्या नेमकी कोणत्या पुराव्यांच्या आधारे निश्चित करण्यात आली, याचा सविस्तर तपशील आरोपपत्रात स्पष्ट करण्यात आलेला नाही.

४ जून २०२६ रोजी देणगीची मोजणी सुरू असताना एका कर्मचाऱ्याला नोटांचे बंडल बाहेर काढताना आढळून आल्याने प्रकरणाचा उलगडा झाला. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासणीत मोजणीच्या खोलीतील बाथरूममधून तब्बल २.२५ लाख रुपये रोकड हस्तगत करण्यात आल्याचे आरोपपत्रात नमूद आहे. या घटनेची माहिती तत्कालीन सरचिटणीस चंपत राय यांच्यापर्यंत व्हिडिओ आणि लेखी संदेशाद्वारे पोहोचवण्यात आली होती. आरोपपत्रातील राय यांच्या जबाबानुसार, ४ जून रोजी दिल्लीहून अयोध्येला जात असताना आनंद कुमार चौधरी यांनी त्यांना व्हॉट्सअॅपवर संदेश पाठवला. त्यासोबत बाथरूममधून रोकड सापडल्याचा व्हिडिओ आणि लेखी माहितीही होती. संदेशात देणगी मोजणाऱ्या काही व्यक्तींकडून अनेक दिवसांपासून पैसे चोरले जात असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र ६७ जणांचा सहभाग आणि चोरीचा कालावधी याबाबतचे आरोप न्यायालयीन प्रक्रियेत अद्याप सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे राम मंदिराच्या देणगी व्यवस्थेतील सुरक्षा, मोजणी प्रक्रियेवरील देखरेख आणि कथित गैरव्यवहारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# मतदारांची 'चोरी' लपवण्याचा प्रयत्न?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण अर्थात 'एसआयआर'वरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी तातडीची बैठक घेतली. या बैठकीनंतर मतदारांना काही महत्त्वाचे दिलासे देण्यात आले असले, तरी एसआयआर प्रक्रियेवर उपस्थित झालेल्या मूलभूत प्रश्नांचे काय, हा मुद्दा कायम आहे.

एसआयआरदरम्यान नोटीस मिळालेल्या मतदारांना आता प्रत्येक प्रकरणात निवडणूक कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज राहणार नाही. बूथ लेव्हल अधिकारी अर्थात बीएलओ संबंधित मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे आणि माहिती घेतील. ही कागदपत्रे प्रणालीवर अपलोड करून त्याआधारे पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

महाराष्ट्रात दावे आणि हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत १२ ऑक्टोबर २०२६पर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यांचा निपटारा १० नोव्हेंबरपर्यंत करावा लागणार आहे. त्यामुळे मतदारांना अतिरिक्त वेळ मिळणार असला, तरी यादीतून मतदारांची 'चोरी' केली जात असल्याचा विरोधकांचा आरोप नेमका कितपत खरा आहे, आणि एसआयआरमुळे किती मतदारांच्या नोंदींवर परिणाम झाला आहे, याची पारदर्शक माहिती समोर येणे महत्त्वाचे आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे प्रक्रिया सुलभ होण्याची शक्यता असली, तरी केवळ नियमांमध्ये बदल करून विश्वासाचा प्रश्न सुटणार नाही. मतदारांची नावे सुरक्षित आहेत का, वगळली गेल्यास त्यामागचे कारण काय आणि हरकतींवर निष्पक्षपणे निर्णय होणार का या प्रश्नांची स्पष्ट उत्तरेच एसआयआरवरील संशय दूर करू शकतील.

# बाळासाहेबांच्या वारशाची पुन्हा एकजूट! राज-उद्धव एकत्र; एसआयआरविरोधात मुंबईत जनमोर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा ठाकरे बंधू एकाच राजकीय व्यासपीठावर येण्याची घोषणा झाली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईत संयुक्त जनमोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण म्हणजेच 'एसआयआर' आणि निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात असल्याचे राज ठाकरे यांनी जाहीर केले आहे.

राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे या मोर्चाला केवळ दोन पक्षांचा कार्यक्रम न ठेवता जनतेचा आणि संपूर्ण राजकीय व्यवस्थेचा आवाज बनवण्याचे आवाहन केले आहे. तसेच इतर सर्व राजकीय पक्षांशी संवाद साधून त्यांना मोर्चात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगाच्या कामकाजावर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दोन निवडणूक आयुक्तांनी काही निर्णयांवर आक्षेप नोंदवल्याच्या वृत्तानंतर हा वाद अधिक तीव्र झाला आहे.

दरम्यान, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी यापूर्वीही राजकीय मतभेदांवर वेगवेगळ्या भूमिका घेतल्या आहेत. त्यामुळे ४ ऑक्टोबरचा संयुक्त मोर्चा हा त्यांच्या राजकीय सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. मात्र मोर्चाचे नेमके ठिकाण आणि वेळ अद्याप जाहीर झालेली नाही.

राज ठाकरे यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करत लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. पोस्टच्या शेवटी त्यांनी 'राज ठाकरे – उद्धव ठाकरे' असा उल्लेख करत दोन्ही बंधूंच्या संयुक्त भूमिकेचे संकेत दिले आहेत.

# मंदिर असो वा चर्च, दारावर 'धर्म' का तपासला जावा?

## धर्मस्वातंत्र्याच्या नावाखाली भीतीचे कुंपण उभे राहिले तर समाजाची शांतता कुठे उरेल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

धमतरीतील ११६ वर्षे जुन्या सुंदरगंज मेनोनाइट चर्चच्या बाहेर लागलेला फलक सध्या केवळ एका चर्चचा प्रश्न राहिलेला नाही. 'प्रार्थनेसाठी प्रवेश केवळ ख्रिश्चनांसाठी' आणि इतरांनी स्वेच्छेने प्रवेश केल्यास 'स्वतःच्या जबाबदारीवर' अशी सूचना देणारे फलक धमतरीतील अनेक चर्चबाहेर दिसत आहेत. स्थानिक ख्रिश्चन फोरमच्या म्हणण्यानुसार, हे फलक नव्या धर्मस्वातंत्र्य कायद्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य कायदेशीर कारवाई आणि आरोपांपासून बचाव करण्यासाठी लावण्यात आले आहेत.

प्रश्न असा आहेएखाद्या प्रार्थनास्थळी जाण्यापूर्वी आता नागरिकाने स्वतःचा धर्म सिद्ध करायचा का?

धर्मांतर जर बळजबरीने, फसवणुकीने किंवा प्रलोभनाने केले जात असेल तर त्याविरोधात कायदा असायलाच हवा. छत्तीसगडच्या २०२६च्या कायद्याचा सरकारनेही उद्देश बेकायदेशीर धर्मांतर रोखणे असा सांगितला आहे. कायद्यात धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीस प्रशासनाला पूर्वकल्पना देण्याची तरतूद आहे आणि विविध परिस्थितींमध्ये कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

पण कायद्याचा उद्देश आणि त्याचा सामाजिक परिणाम हे दोन वेगळे प्रश्न आहेत.

आज चर्चच्या बाहेर 'परक्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर प्रवेश करावा' असा फलक लागतो. उद्या एखाद्या मंदिराबाहेर दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीसाठी तसाच फलक लागला तर? त्यानंतर मशिदी, गुरुद्वारे, विहार किंवा इतर प्रार्थनास्थळांबाहेरही धर्मानुसार प्रवेशाच्या सीमा आखल्या गेल्या तर?

मग प्रश्न धर्मांतराचा राहणार नाही. प्रश्न राहील आपण एकमेकांच्या श्रद्धास्थळांपासून समाजाला दूर नेत आहोत का?

धमतरीतील परिस्थितीबाबत ख्रिश्चन समुदायाने प्रार्थनासभांमध्ये अडथळे आणले जात असल्याचा दावा केला आहे. दुसरीकडे, धर्मांतराच्या आरोपांमुळे तणाव निर्माण झाल्याचेही वृत्त आहे. या दोन्ही बाजूंची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. कारण आरोप आणि सिद्ध गुन्हा यांच्यात कायद्याची स्पष्ट सीमारेषा असते.

आणखी चिंतेची बाब म्हणजे, वृत्तांनुसार हजाराहून अधिक गैर-ख्रिश्चन नागरिकांनी प्रशासनाकडे आपण स्वेच्छेने प्रार्थनासभांना जात असल्याचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. म्हणजेच आता श्रद्धेच्या स्वातंत्र्यालाही 'मी कोणत्याही दबावाखाली नाही' असे कागदोपत्री सिद्ध करण्याची वेळ येत आहे का?

हा कायदा फक्त धर्मांतर रोखतोय की धर्मांमधील संशयही वाढवतोय?

हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

भारताची ताकद मंदिर, चर्च, मशीद किंवा गुरुद्वारांच्या संख्येत नाही; तर वेगवेगळ्या श्रद्धांचे लोक एकमेकांच्या अस्तित्वाचा स्वीकार करून जगतात यात आहे. कायदा बेकायदेशीर धर्मांतर रोखू शकतो; पण समाजात निर्माण झालेला संशय कायद्याने दूर करता येत नाही.

धर्माच्या नावाने भीती वाढली, प्रार्थनेच्या ठिकाणी प्रवेशापूर्वी धर्म तपासला जाऊ लागला आणि प्रत्येक धार्मिक कार्यक्रम संशयाच्या नजरेतून पाहिला जाऊ लागला, तर शांततेचे काय?

आज फलक चर्चबाहेर लागला आहे. उद्या तो मंदिराबाहेर लागणार नाही, याची हमी कोण देणार?

धर्मस्वातंत्र्याचे संरक्षण म्हणजे केवळ धर्म बदलण्याचा अधिकार नव्हे; तर आपल्या श्रद्धेचे पालन करण्यासोबत दुसऱ्याच्या श्रद्धेच्या अस्तित्वाचा सन्मान करण्याची हमीही आहे.

म्हणूनच सरकारसमोर आणि समाजासमोर एकच मूलभूत प्रश्न उभा राहतो

कायदा धर्मांतर थांबवण्यासाठी आहे की समाजाच्या मनांमध्ये अदृश्य भिंती उभ्या करण्यासाठी?

या प्रश्नाचे उत्तर जितके लवकर आणि पारदर्शकपणे मिळेल, तितके मंदिर आणि चर्च दोन्ही सुरक्षित राहतीलआणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, माणूस माणसापासून दूर जाणार नाही.

## संपादकीय

### विम्याचा धंदा की ग्राहकहिताचा सौदा?

विमा म्हणजे संकटाच्या काळात आर्थिक आधार देणारे कवच. पण या कवचाभोवती उभ्या राहिलेल्या प्रचंड व्यावसायिक व्यवस्थेत ग्राहक नेमका केंद्रस्थानी आहे का, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (खठ्अख) विमा वितरणाच्या अर्थकारणात मोठे बदल सुचवले आहेत. 'रिकॅलिब्रेटिंग इकॉनॉमिक्स ऑफ इन्शुरन्स डिस्ट्रिब्युशन' या प्रस्तावामुळे विमा विक्रीतून कंपन्या, बँका आणि मध्यस्थ किती कमावतात, याचे गणितच बदलण्याची शक्यता आहे. प्रश्न एवढाच नाही की कमिशन किती कमी होणार; प्रश्न हा आहे की या संपूर्ण व्यवस्थेत ग्राहकाला किती फायदा होणार?

प्रस्तावातील आकडे पाहिले तर बदलाची तीव्रता लक्षात येते. कर्जाशी संबंधित जीवन विम्याचे कमिशन २८ टक्क्यांवरून थेट २ टक्क्यांपर्यंत आणण्याचा प्रस्ताव आहे. कर्जासोबतच्या मोटार थर्ड पार्टी विम्यावर कमिशन शून्य करण्याची सूचना आहे. स्वतःच्या वाहनाच्या नुकसानीच्या विम्यावरील कमिशन १६ टक्क्यांवरून ५ टक्के, तर आरोग्य विम्यावरील कमिशन ४० टक्क्यांवरून ५ टक्के करण्याचा प्रस्ताव आहे. अर्थात, हे अंतिम नियम नाहीत. २५ ऑक्टोबरपर्यंत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्यामुळे अंतिम निर्णयापूर्वी या प्रस्तावाचे परिणाम, उद्योगाचे म्हणणे आणि ग्राहकहित या तिन्हींचा विचार होणे अपेक्षित आहे.

एक मूलभूत प्रश्न येथे उपस्थित होतोएवढ्या मोठ्या कमिशनमधून आतापर्यंत नेमके काय विकले जात होते? विमा की कमिशन?

जर एखाद्या उत्पादनावर ४० टक्क्यांपर्यंत कमिशन मिळत असेल आणि ते आता ५ टक्क्यांपर्यंत आणण्याचा विचार होत असेल, तर ग्राहकाला योग्य उत्पादन निवडून देण्यापेक्षा अधिक कमिशन मिळणारे उत्पादन विकण्याची प्रलोभने या व्यवस्थेत होती का, याची चर्चा होणे स्वाभाविक आहे. विमा हा ग्राहकाच्या गरजेचा विषय आहे; विक्रेत्याच्या कमिशनचा नव्हे. त्यामुळे नियामकाने कमिशनच्या रचनेवर प्रश्न उपस्थित केला असेल तर त्याकडे केवळ उद्योगाच्या कमाईवरील आघात म्हणून पाहता येणार नाही.

मात्र दुसरी बाजूही दुर्लक्षित करून चालणार नाही. विमा एजंट, बँका, दलाल आणि डिजिटल वितरण व्यवस्था ही ग्राहकापर्यंत विमा पोहोचवणारी यंत्रणा आहे. कमिशन अत्यल्प झाले आणि वितरण खर्चाची भरपाई झाली नाही, तर विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागात विमा विक्रीची आर्थिक व्यवहार्यता कमी होऊ शकते. मोठ्या शहरातील डिजिटल ग्राहकापर्यंत विमा पोहोचवणे सोपे; पण दुर्गम गावातील शेतकरी, छोटा व्यापारी किंवा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबाला विम्याचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी प्रत्यक्ष मनुष्यबळ लागते. त्या वितरण व्यवस्थेचे काय?

म्हणूनच कमिशनला कात्री लावणे म्हणजे आपोआप ग्राहकहित साधणे नव्हे. कमिशन कमी केल्यानंतर त्याचा फायदा प्रीमियममध्ये, सेवांमध्ये किंवा विमा संरक्षणात ग्राहकाला मिळतो का, हेही पाहावे लागेल. अन्यथा मध्यस्थाचे कमिशन कमी होईल; पण ग्राहकाचा खर्च तसाच राहील. मग बदल कोणाच्या फायद्याचा?

या प्रस्तावाची झलक शेअर बाजारातही दिसली. २४ सप्टेंबरला सेन्सेक्स १,२४७.७१ अंकांनी, तर निफ्टी ५० मध्ये ३८३.७० अंकांची घसरण झाली. बजाज फायनान्स, ॲक्सिस बँक आणि बजाज फिनसर्व्ह यांसारख्या समभागांवर दबाव आला. मात्र बाजारातील त्या दिवसाच्या घसरणीचे संपूर्ण कारण विमा कमिशन प्रस्तावाला ठरवणे योग्य ठरणार नाही. जागतिक बाजारातील अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींसह अनेक घटक बाजारावर परिणाम करत असतात. तरीही गुंतवणूकदारांनी भविष्यातील कमाईवर संभाव्य परिणामाचा विचार केला, हे या प्रस्तावाचे आर्थिक महत्त्व अधोरेखित करते.

खरा कस आता नियामकाचा आहे. विमा कंपन्यांची कमाई, मध्यस्थांचे अस्तित्व आणि ग्राहकांचे हित या तिन्हीमध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. ग्राहकाला फसवणूक नको, चुकीची विक्री नको, अनावश्यक विमा नको; पण त्याचवेळी त्याला विमा मिळण्याची प्रक्रिया महाग, गुंतागुंतीची किंवा दुर्गमही नको. विमा क्षेत्रात कमिशन किती असावे हा केवळ टक्केवारीचा प्रश्न नाही; तो ग्राहकाला मिळणाऱ्या संरक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. नियामकाने प्रस्ताव मांडला आहे. आता उद्योगाने आपल्या कमाईचे समर्थन करण्यापेक्षा वितरणाचा खरा खर्च स्पष्ट करावा आणि ग्राहकांनीही 'कमी कमिशन म्हणजे स्वस्त विमा' या सरळ समीकरणावर विसंबून राहू नये. शेवटी प्रश्न एकचविम्याच्या बाजारात पैसा फिरत राहणार की ग्राहकाचा विश्वासही वाढणार? कारण विम्याचा खरा अर्थ कमिशनच्या आकड्यात नसतो; संकटाच्या वेळी ग्राहकाच्या हातात प्रत्यक्ष किती संरक्षण उरते, यात असतो.

# पिंपरी-चिंचवडमध्ये १ लाख ४१ हजार गणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक विसर्जन

## ३३ हजारांहून अधिक शाडू मातीच्या मूर्तींचा समावेश; ६७.७८ टन निर्माल्याचे संकलन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या आवाहनाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. गणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक विसर्जन, निर्माल्याचे स्वतंत्र संकलन, कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती तसेच शाडू मातीच्या पुनर्वापरासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे यंदाचा गणेशोत्सव पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

महापालिकेने नैसर्गिक जलस्रोतांमध्ये थेट गणेशमूर्तींचे विसर्जन होऊ नये, यासाठी शहरात ६३ कृत्रिम विसर्जन तलाव उपलब्ध करून दिले होते. या माध्यमातून सुमारे १ लाख ४१ हजार २४६ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यामध्ये ३८ हजार ८६ पर्यावरणपूरक अर्थात शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा समावेश असल्याची महापालिकेची आकडेवारी आहे.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय मूर्ती विसर्जनाची संख्या पाहता, ज क्षेत्रीय कार्यालयात सर्वाधिक २६ हजार ५२३ मूर्तींचे विसर्जन झाले.

त्यापाठोपाठ ब क्षेत्रीय कार्यालयात २० हजार ५२३, इ क्षेत्रीय कार्यालयात १५ हजार ४२०, ल क्षेत्रीय कार्यालयात १२ हजार ११६, अ क्षेत्रीय कार्यालयात १२ हजार ७८०, ह क्षेत्रीय कार्यालयात १२ हजार ९६, क क्षेत्रीय कार्यालयात १२ हजार ३७२, ड क्षेत्रीय कार्यालयात १२ हजार ८०, ग क्षेत्रीय कार्यालयात १० हजार २८ आणि फ क्षेत्रीय कार्यालयात ७ हजार ३०८ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.



**६७.७८ टन निर्माल्य संकलित**

गणेशोत्सवाच्या काळात निर्माल्याचे जलस्रोतांमध्ये विसर्जन होऊ नये, यासाठी महापालिकेने स्वतंत्र संकलन व्यवस्था केली होती. उपलब्ध दैनंदिन नोंदीनुसार तब्बल ६७ हजार ७७९.४५ किलो म्हणजेच सुमारे ६७.७८ मेट्रिक टन निर्माल्याचे संकलन करण्यात आले.

फुले, हार आणि अन्य निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करून त्याचे योग्य व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यावर भर देण्यात आला. निर्माल्य थेट नदी, नाले किंवा तलावांमध्ये न जाता स्वतंत्रपणे संकलित केल्यामुळे जलप्रदूषण रोखण्यास मदत झाली.

**शाडू मातीच्या पुनर्वापराला चालना**

पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या वापराबरोबरच विसर्जनानंतर उपलब्ध होणाऱ्या शाडू मातीचा पुनर्वापर करण्यावरही महापालिकेने भर दिला. उपलब्ध नोंदीनुसार १ हजार ७७१ किलो शाडू मातीचे संकलन करण्यात आले आहे. तसेच ११ हजार ४८९ किलो माती पुनर्वापरासाठी स्वयंसेवी संस्थांना उपलब्ध करून देण्यात आली.

गणेशमूर्ती विसर्जनानंतर माती वाया न जाता तिचा पुनर्वापर व्हावा, यासाठी नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे 'मूर्तीपासून मातीपर्यंत' पर्यावरणपूरकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न महापालिकेने केला.

**नैसर्गिक जलस्रोतांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न**

गणेशोत्सवाच्या काळात नदी, नाले, तलाव आणि इतर नैसर्गिक जलस्रोतांमध्ये मोठ्या प्रमाणावर मूर्तींचे विसर्जन झाल्यास जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर कृत्रिम विसर्जन तलाव, निर्माल्य संकलन आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या वापराला प्रोत्साहन देण्यात आले.

कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर वाढल्याने नैसर्गिक जलस्रोतांमध्ये थेट मूर्ती विसर्जित होण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली. त्याचबरोबर शाडू मातीच्या मूर्तींचा वापर आणि विसर्जनानंतर मातीचा पुनर्वापर यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न झाला.

पर्यावरण संवर्धन ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून नागरिकांच्या सहभागाशिवाय ती प्रभावीपणे राबविता येत नाही. यंदाच्या गणेशोत्सवातील मूर्ती संकलन, निर्माल्य व्यवस्थापन आणि शाडू मातीच्या पुनर्वापराची आकडेवारी नागरिकांच्या सहभागातून पर्यावरणपूरक उत्सवाची दिशा अधिक मजबूत होत असल्याचे चित्र दाखवते.

# आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत डीवायपीसीओइ, आकुर्डी आणि पीसीसीसीएस, चिंचवड विजयी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत मुलांच्या गटामध्ये अंतिम स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, आकुर्डी संघाने पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी संघाचा ३ विरुद्ध १ या गुण फरकाने विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर मुलींच्या गटामध्ये अंतिम स्पर्धेत प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर सायन्स, चिंचवड संघाने पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी संघाचा २ विरुद्ध ० गुण फरकाने विजय मिळवून प्रथम क्रमांक मिळविला.




या स्पर्धेचे पीसीसीओई येथील स्पोर्ट कॉम्प्लेक्स मध्ये उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. अक्षय काशीद व डॉ. गणेश चव्हाण, एसपीपीयुचे अधिसभा सदस्य डॉ. रमेश गायकवाड आदी उपस्थित होते.

मुलांच्या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील ३५ संघांनी आणि मुलींच्या स्पर्धेत २९ संघांनी सहभाग घेतला होता. पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, डीन एसडीडब्ल्यू डॉ. पद्माकर देशमुख, स्पर्धेचे समन्वयक पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष पाचारणे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेच्या मुले व मुली स्पर्धेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या संघांना स्पर्धा आयोजक पीसीसीओई महाविद्यालयाच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सर्व विजेत्या संघांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यांमध्ये मुलांच्या गटात पीसीसीओई, निगडी संघाने एसएई, कोंढवा संघाला व डीवायपीसीओइ, आकुर्डी संघाने पीसीसीओईआर रावेत संघाला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

तसेच मुलींच्या गटात पीसीसीओई, निगडी संघाने पीसीसीओईआर, रावेत व पीसीसीसीएस, चिंचवड संघाने एएलसी, कान्हे संघाला नमवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. स्पर्धेचा अंतिम निकाल मुले विभाग प्रथम :- डीवायपीसीओइ, आकुर्डी; द्वितीय :- पीसीसीओई, निगडी आणि तृतीय क्रमांक : पीसीसीओईआर, रावेत या संघाने मिळवला. मुलीच्या विभागात प्रथम क्रमांक पीसीसीसीएस, चिंचवड; द्वितीय क्रमांक :- पीसीसीओई, निगडी आणि तृतीय क्रमांक :- एएलसी, कान्हे या संघाने मिळवला.

# प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. २७ सप्टेंबर) आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

मराठवाडा जनविकास परिषद ही संस्था गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. मंगेश कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासह परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना 'मराठवाडा मित्र' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत ठाणे येथील गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे होणार आहे. या कार्यक्रमाला स्थानिक खासदार नरेश म्हस्के आणि आमदार संजय केळकर यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

प्रा. डॉ. मंगेश कराड हे गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली एमआयटी एडीटी विद्यापीठात शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# विचारल्याने बांदल पिता-पुत्रावर हल्ला

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

फिर्यादी दिलीप सुरेश बांदल (वय ४२, रा. बांदल फार्म, सुसगाव) यांच्या तक्रारीनुसार, घटनेच्या रात्री आरोपी आदेश टेमकर, दत्ता घाडगे, सोन्या राहुल ढगे, दर्शन कसबे, शिवतेज पवार, स्वराज मुरकुटे, सचिन वैराट आणि विकास ससार हे सर्वजण दारू पीत बसले होते.

त्यांचा मुलगा विश्वजित हा त्यांना जाब विचारण्यासाठी गेला असता, आरोपींनी थेट जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यात दोन वेळा दगड मारून गंभीर जखमी केले. त्यानंतर फिर्यादी दिलीप बांदल यांनाही जीवे मारण्याचा प्रयत्न करत त्यांच्या डोक्यात दगड मारून, शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

**बाणेर/बावधन: 'गाडी नीट चालव' म्हटल्याचा राग; तरुणाच्या डोक्यात, कानामागे दुचाकीची चावी खुपसली!**

बालेवाडी येथील मुंबई लेनने ऑर्चिड हॉटेलजवळ वाहतुकीच्या वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. फिर्यादी शुभम दिलीप सोनवणे (वय २९, रा. बावधन) यांनी आरोपी यश नरेंद्र जाधव (वय १९, रा. सुतारवाडी) याला दुचाकी वेडीवाकडी चालवण्यावरून हटकले असता, यश जाधव आणि त्याच्यासोबत असलेल्या दिव्या जाधव यांनी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केली. वादाच्या भरात आरोपी यश जाधव याने हातातील दुचाकीची चावी थेट शुभम यांच्या डोक्यात, कानावर, कानाच्या पाठीमागे आणि नाकावर जोरात खुपसून त्यांना गंभीर जखमी केले व ''तुला सोडणार नाही'' अशी धमकी दिली. बावधन पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

**काळेवाडी: इन्स्टाग्रामवर मैत्री, आमिष दाखवून विवाहितेला ८ लाख १४ हजारांचा सायबर चुना**




काळेवाडीतील नढेनगर परिसरात राहणाऱ्या एका ३४ वर्षीय गृहिणीला सायबर भामट्यांनी प्रेमाचे आणि जादा पैशांचे आमिष दाखवून तब्बल ८ लाख १४ हजार रुपयांचा गंडा घातला. व.हरलङ्ग्शऑर्हीपूरऑ०१ या इन्स्टाग्राम अकाउंटधारकाने फिर्यादीशी ओळख वाढवली. साधेपणाचा गैरफायदा घेऊन, ''मी तुझ्याशी लग्न करेन'' असे भासवून विश्वास संपादन केला. त्यानंतर वेगवेगळ्या बहाण्यांनी आणि पैशांचे आमिष दाखवून वेळोवेळी ऑनलाइन माध्यमातून तब्बल ८,१४,०००/- रुपये उकळले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच काळेवाडी पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यासह (खढ अलीं) फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**तळेगाव दाभाडे: ''मदत करतो'' म्हणाला अन् हातचलाखीने अढ्म् कार्ड बदलून ३४ हजारांचा गंडा घातला!**

तळेगाव दाभाडे येथील एसबीआय शांताई सिटी एटीएम सेंटरमध्ये एका महिलेची हातचलाखीने फसवणूक करण्यात आली. फिर्यादी मेनाबाई श्रीराम (वय ३५, रा. काका हलवाई समोर, तळेगाव दाभाडे) या पैसे काढण्यासाठी एटीएममध्ये गेल्या असता दोन अनोळखी व्यक्तींनी ''आम्ही तुम्हाला पैसे काढून देतो'' असे भासवले. फिर्यादीच्या अज्ञानाचा फायदा घेत आरोपींनी त्यांचे एटीएम कार्ड स्वतःजवळ ठेवून त्याजागी 'हरिलाल जयस्वाल' नावाचे दुसरेच एटीएम फिर्यादीच्या हातात टेकवले. त्यानंतर त्यांच्या खात्यातून रोख ३४,५०० रुपये काढून पोबारा केला. तळेगाव दाभाडे पोलिसांनी अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**दुसरी तक्रार: मित्राच्या घराशेजारी दारू पिण्यावरून वाद, दुसऱ्या गटाकडूनही जीवघेणा प्रतिहल्ला**

दुसऱ्या बाजूने दर्शन अविनाश कसबे (वय १९, रा. मुळशी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते आणि त्यांचे मित्र प्रज्वल बांदल याच्या घराशेजारील मोकळ्या जागेत गप्पा मारत बसले होते. त्यावेळी दिलीप बांदल, विश्वजित बांदल, राजवर्धन बांदल, गोवर्धन बांदल आणि प्रज्वल बांदल हे त्याठिकाणी आले आणि त्यांनी शिवीगाळ करत मारहाण सुरू केली.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपी विश्वजित बांदल याने शिवतेज पवार याच्या डोक्यात दगड मारून त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर राजवर्धन बांदल याने ''आता तुला ठारच मारतो'' अशी धमकी देत आदेश टेमकर याच्या डोक्यात व तोंडावर सलग तीन वेळा दगड घातला. तसेच इतर आरोपींनीही ''आता संपवूनच टाकू'' म्हणत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

**गुन्हा नोंद:** बावधन पोलीस ठाणे – भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०९, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५), १८९(२), १९१(२), १९०. या दोन्ही परस्परविरोधी प्रकरणांचा पुढील तपास बावधन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ठाकूर करत आहेत. एकाच रात्री घडलेल्या या रक्तरंजित राड्यामुळे सुस आणि बावधन परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### एरंडवणेत दरोड्याच्या तयारीत पाच जणांना अटक

■ पुणे : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून शहरात गस्त आणि बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. याचदरम्यान डेक्कन पोलिसांनी एरंडवणे परिसरात दरोड्याच्या तयारीत असल्याच्या संशयावरून पाच जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून धारदार हत्यारे, लाल तिखटाची पावडर आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. डेक्कन पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करत असताना पोलिस अंमलदार सचिन गायकवाड यांना एरंडवणे येथील मित्र मंडळ (चावडी) परिसरातील गणेश मंदिराच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर काही जण दरोड्याच्या तयारीने थांबले असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

माहिती मिळताच पोलिस पथकाने तातडीने संबंधित ठिकाणी धाव घेतली. इमारतीच्या वरच्या मजल्यावरील खोलीचा दरवाजा उघडण्यास पोलिसांनी सांगितले. दरवाजा उघडल्यानंतर खोलीत पाच जण आढळून आले. त्यांच्या जवळील टेबलवर धारदार हत्यारे, लाल तिखटाची पावडर आणि अन्य साहित्य पोलिसांना आढळले. पोलिसांनी पाचही जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याविरोधात डेक्कन पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४), आर्म्स ॲक्ट कलम ४(२५) तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७(१) सह १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पर्यावरणपूरक कृत्रिम विसर्जन हौदाला मंचरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## १११ घरगुती गणेशमूर्तींसह १० सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींचे कृत्रिम हौदात विसर्जन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत मंचर नगरपंचायतीने राबविलेल्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमाला मंचर शहरातील नागरिक व गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बेलमळा घाट येथे नगरपंचायतीने उभारलेल्या कृत्रिम विसर्जन हौदात १११ घरगुती गणेशमूर्तींसह १० सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

नैसर्गिक जलस्रोतांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन केल्यामुळे होणारे जलप्रदूषण टाळून पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने नगरपंचायतीने सुमारे २१ बाय १४ मीटर आकाराचा आणि १५ फूट खोलीचा कृत्रिम विसर्जन हौद तयार केला होता. नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत मोठ्या संख्येने कृत्रिम हौदाचा वापर केला.

नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी किरण मार्कंड यांनी नागरिकांमध्ये जनजागृती करून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कृत्रिम विसर्जन हौदाचा वापर करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत गणेशभक्तांनी आपल्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम हौदात केले.



यावेळी नगरपंचायतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांचे शाल, श्रीफळ व रोपटे देऊन पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी नगराध्यक्षा राजश्री दत्ता गांजळे, उपनगराध्यक्ष संदीप माधव थोरात, आरोग्य सभापती सोनाली बाणखेले, गटनेते विकास जाधव, बांधकाम सभापती धनंज मोरे, नियोजन सभापती वसंत बाणखेले, महिला व बालकल्याण सभापती माणिक गाडवे, उपसभापती अंजली बाणखेले यांच्यासह नगरसेवक, नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**निर्माल्यापासून सेंद्रिय खतनिर्मिती**

गणेशमूर्ती विसर्जनासोबतच भाविकांकडून जमा होणाऱ्या निर्माल्याचे स्वतंत्र संकलन करण्यात आले. नगरपंचायतीच्या वतीने दरवर्षी निर्माल्यापासून सेंद्रिय खतनिर्मितीचा उपक्रम राबविण्यात येतो. संकलित निर्माल्याचे योग्य पद्धतीने पुनर्वापर करून त्यापासून सेंद्रिय खत तयार करण्यात येणार आहे.

**लकी ड्रॉमधून आकर्षक बक्षिसे**

कृत्रिम विसर्जन हौदात गणेशमूर्तींचे विसर्जन करणाऱ्या नागरिकांना नगरपंचायतीच्या वतीने कूपन देण्यात आले. या कूपनमधून लकी ड्रॉद्वारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात येणार असून विजेत्यांना सन्मानपत्रासह आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. नगरपंचायतीच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सव काळात नैसर्गिक जलस्रोतांवरील विसर्जनाचा ताण कमी करण्यास तसेच जलप्रदूषण रोखण्यास मदत झाली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षवेधी ठरला. या मंडळांनी केले कृत्रिम हौदात विसर्जन : कमलमाई प्रसादिक भजनी मंडळ, मोरडेवाडी; कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केटचा राजा; साईकृपा गणेश मंडळ, खानवस्ती; राजगुरू गणेश उत्सव मंडळ, लहुजी वस्ताद चौक; शिवस्मृती गणेश मंडळ, भक्ते मळा; देशिश्वर गणेश मंडळ, माळवाडी; गोफेश्वर गणेश मंडळ, डोबी मळा; शिवराय नगर गणेश मित्र मंडळ; छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समिती, बाप्पा संभाजी महाराज चौक आणि भैरवनाथ तरुण गणेश मंडळ, भैरवनाथ गल्ली.

# धामणीत खंडोबाला पत्रीपूजा व फुलांची आकर्षक आरास

## भाद्रपद पौर्णिमेनिमित्त शेकडो भाविकांनी घेतले श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी। प्रतिनिधी

धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात भाद्रपद पौर्णिमेनिमित्त पारंपरिक पत्रीपूजा व फुलांचा आरास सोहळा मोठ्या भक्तिभावात शनिवारी (दि. २६) पार पडला. मंदिरातील स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांना रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात सुगंधी फुले व फळांची आकर्षक सजावट करण्यात आल्याने संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय आणि सुगंधित वातावरणाने भारून गेला होता.

भाद्रपद पौर्णिमेच्या मुहूर्तावर पहाटे चार वाजता मंदिरात घंटानाद करण्यात आला. त्यानंतर आठ यजमान जोडप्यांच्या हस्ते दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक विधी पार पडला. खंडेराय, म्हाळसाई,



बाणाई व जोगेश्वरी यांच्या मूर्तींना वस्त्रालंकार तसेच सुगंधी फुलांचे हार अर्पण करण्यात आले.

देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, राजेश भगत व अनिरुद्ध वाळुंज यांच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच पंचधातूच्या खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मुखवट्यांना सुवासिक केशर व दवणा अत्तरमिश्रित पत्रीच्या पानांचे लेपन करण्यात आले. त्यानंतर खंडेरायाला नैवेद्य दाखवून शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.

पौर्णिमेच्या अभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले. मंदिराच्या गाभाऱ्यात झेंडू, गुलाब व अष्टरच्या फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. ही फुलांची सजावट पहाडदऱ्याचे उपसरपंच कैलास वाघ व शरद बँकेचे शाखाधिकारी अनिल आदक यांच्या सौजन्याने करण्यात आली.

पहाटे स्वयंभू सप्तशिवलिंगाला पत्री अर्पण केल्यानंतर उपस्थित भाविकांच्या कपाळाला भंडारा लावण्यात आला. आरतीनंतर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी शेकडो भाविकांनी 'सदानंदाचा येळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार' असा जयघोष करत श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले.

भाद्रपद पौर्णिमेनिमित्त पंचक्रोशीतील भाविक कुटुंबासह मोठ्या संख्येने मंदिरात दाखल झाले होते. खंडोबाचे दर्शन घेण्याबरोबरच तळी-भंडार करण्यासाठीही भाविकांची गर्दी झाली होती.

# ३८ वा पुणे फेस्टिवलमध्ये 'आविष्कार भारती' ने मंत्रमुग्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या माजी विद्यार्थी आणि सध्याच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यरचनांची सायंकाळ 'आविष्कार भारती' हा कार्यक्रम ३८ व्या पुणे फेस्टिवल अंतर्गत सादर करण्यात आला. या कार्यक्रमाने मंत्रमुग्ध केले.

या सायंकाळची सुरुवात पुण्याच्या ज्ञान आणि संस्कृतीचा गौरव करणाऱ्या 'शिक्षा और संस्कृति की धरोहर – पुणे' या विशेष सादरीकरणाने झाली. या नृत्यरचनेने विभागीय युवा महोत्सवात प्रथम पारितोषिक पटकावले होते.

या सायंकाळी कथक, भरतनाट्यम, सत्रिय आणि मोहिनीअट्टम या नृत्यप्रकारांचे उत्कृष्ट सादरीकरण झाले. यामध्ये सायली काणे यांची दशमहाविद्या, श्रुती कुलकर्णी





यांची सोल इन एक्झाइल, सिद्धी अभय यांची शिखंडी, जयश्री आणि मधुरा इनामदार यांची तृष्णा आणि आदी स्कूल ऑफ डान्सची आंध मुनि यांसारख्या विषयप्रधान नृत्यरचनांचा समावेश होता. या सर्व संकल्पना अतिशय प्रभावी होत्या आणि प्रत्येक रसिकांच्या मनाला भिडल्या.

पूर्वा शहा यांची होरी, तसेच भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कथक तराणा आणि कालिंगा नर्तन तिल्लान यांसारख्या पारंपारिक रचनांनी कार्यक्रमात शास्त्रीय सौंदर्याची भर घातली आणि प्रेक्षकांवर अविस्मरणीय छाप पाडली. संपूर्ण नृत्य-संध्येचे समन्वयन नृत्य विभाग प्रमुख डॉ. देविका बोरठाकुर आणि स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे संचालक प्रा. शारंगधर साठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या प्रसंगी पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, प्रा. शारंगधर साठे, देविका बोरठाकुर आणि श्रीमती मनीषा अभय, श्रीमती अरुंधती पटवर्धन, श्रीमती लीना केतकर, श्रीमती आभा औटी आणि श्रीमती स्वरदा कुलकर्णी यांसारख्या नामवंत नृत्यांगना आणि गुरू उपस्थित होते.

# पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक तब्बल 33 तास २७ मिनिटे; ४,१७० सार्वजनिक तर ६.२४ लाख घरगुती गणपतींचे विसर्जन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

पुणे शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक यंदा तब्बल ३३ तास २७ मिनिटे चालली. शुक्रवारी, २५ सप्टेंबर रोजी सकाळी ८.४३ वाजता मानाचा पहिला कसबा गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाल्यानंतर सुरू झालेली मिरवणूक शनिवारी, २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.१० वाजता शांततेत पार पडली, अशी माहिती पुणे शहर पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांच्या आकडेवारीनुसार पुणे शहरात विविध दिवसांमध्ये मिळून ४ हजार १७० सार्वजनिक गणपतींचे, तर तब्बल ६ लाख २४ हजार ६८५ घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वाधिक २ हजार ९२७ सार्वजनिक गणपती आणि २ लाख ४१ हजार ५४८ घरगुती गणपतींचे विसर्जन झाले.

**मानाच्या पाच गणपतींच्या मिरवणुकीला लागले ७ ते ९ तास**

मानाचा पहिला कसबा गणपती शुक्रवारी सकाळी ८.४३ वाजता मिरवणुकीसाठी मार्गस्थ झाला. तो सायंकाळी ४.४३ वाजता विसर्जन घाटावर पोहोचला. त्याची संपूर्ण मिरवणूक ८ तास चालली.



मानाचा दुसरा तांबडी जोगेश्वरी गणपती याच्या मिरवणुकीला ७ तास ४४ मिनिटे, तर मानाचा तिसरा गुरुजी तालीम गणपती याच्या मिरवणुकीला ७ तास २६ मिनिटे लागली. मानाचा चौथा तुळशीबाग गणपती याची मिरवणूक ८ तास १० मिनिटे, तर मानाचा पाचवा केसरीवाडा गणपती याची मिरवणूक ८ तास ४६ मिनिटे चालली. सर्व मानाच्या गणपतींची मिरवणूक लक्ष्मी रोड मार्गे विसर्जन घाटाकडे मार्गस्थ झाली.

**दगडूशेठ गणपतीची मिरवणूक ४ तास ९ मिनिटांत पूर्ण**

पुण्यातील महत्त्वाच्या गणपती मंडळांपैकी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती शुक्रवारी सायंकाळी ४.१८ वाजता मिरवणुकीसाठी मार्गस्थ झाला. बेलबाग चौक आणि अलका चौकातून पुढे जात रात्री ८.२७ वाजता पांचाळेश्वर घाटावर विसर्जन झाले. या मिरवणुकीचा एकूण कालावधी ४ तास ९ मिनिटे नोंदवण्यात आला. हुतात्मा बाबू गेणू मंडळाची मिरवणूक ७ तास २२ मिनिटे चालली. मंडळाचा गणपती २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.४३ वाजता मार्गस्थ झाला आणि २६ सप्टेंबर रोजी रात्री १.०५ वाजता विसर्जन घाटावर पोहोचला.

**श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची मिरवणूक ११ तास ८ मिनिटे**

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता मिरवणुकीसाठी मार्गस्थ झाला. रात्री ९.३१ वाजता बेलबाग चौकात आगमन झाल्यानंतर ९.५७ वाजता तेथून मिरवणूक पुढे निघाली. शनिवारी पहाटे २.५० वाजता अलका चौकात आगमन झाले आणि ३.१५ वाजता रथ पुढे मार्गस्थ झाला. सकाळी ४.०८ वाजता मिरवणूक संपली. या गणपतीचे जागेवर विसर्जन करण्यात आले असून मिरवणुकीचा एकूण कालावधी ११ तास ८ मिनिटे इतका नोंदवण्यात आला.

त्याचप्रमाणे अखिल मंडई मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीला ९ तास २९ मिनिटे, तर जिलब्या मारुती मंडळाच्या मिरवणुकीला ७ तास १० मिनिटे लागली.

# दूध भेसळ प्रकरणाशी संबंध जोडणाऱ्यांविरोधात १०० कोटींचा मानहानीचा दावा करणार

## 'मास्टरमाइंड' असल्याचा आरोप करणाऱ्यांना वळसे पाटलांचा इशारा; डिंभे-माणिकडोह बोगदा, इकोझोन आणि प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींवरही भाष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

दूध भेसळ प्रकरणाशी आपला संबंध जोडून आपणच या प्रकरणाचे 'आका' आणि 'मास्टरमाइंड' असल्याचा आरोप करणाऱ्यांविरोधात उच्च न्यायालयात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल करणार, असा इशारा माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिला. दूध भेसळखोरांना आपण कधीही पाठीशी घातलेले नाही, असे स्पष्ट करत त्यांनी दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी भूमिकाही मांडली.

मंचर येथे आयोजित पत्रकार परिषदेत वळसे पाटील बोलत होते. ते म्हणाले की, दूध भेसळ प्रकरणाशी आपला संबंध जोडून काही विरोधकांकडून आपल्यावर आरोप केले जात आहेत. अशा प्रकारे बदनामी करणाऱ्यांविरोधात कायदेशीर मार्गाने कारवाई केली जाईल. आपल्याविरुद्ध करण्यात आलेले आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी आरोप करणाऱ्यांची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून दूध भेसळ प्रकरणाची सखोल चौकशी करून तपास पारदर्शक पद्धतीने करण्याची तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या भूमिकेचे आपण स्वागत करतो, असे वळसे पाटील म्हणाले.

कोणतेही प्रकरण दडपणे चुकीचे आहे. दूध भेसळखोरांवर कारवाई झालीच पाहिजे आणि दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**डिंभे-माणिकडोह बोगद्याला २०२१ पासूनच विरोध**

डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या मुद्द्यावरही वळसे पाटील यांनी स्पष्टीकरण दिले. बोगदा करण्याऐवजी डावा कालवा दुरुस्त केल्यास प्रश्न सुटू शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. या बोगद्याला आपला विरोध असल्याचे पत्र आपण १० मार्च २०२१ रोजी तत्कालीन पाटबंधारे मंत्र्यांना दिले होते, असा दावा त्यांनी केला.

या प्रश्नाचे सध्या काही जण राजकारण करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे बोगद्याबाबतची आपली भूमिका नवीन नसून ती पूर्वीपासूनच स्पष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

**पश्चिम घाट इकोझोनवर केंद्राकडे हरकत**



पश्चिम घाट इको सेन्सिटिव्ह झोनच्या प्रस्तावित अधिसूचनेबाबतही वळसे पाटील यांनी चिंता व्यक्त केली. केंद्र सरकारने २७ जुलै रोजी काढलेल्या अधिसूचनेचा परिणाम आंबेगाव तालुक्यातील ५२ आणि जुन्नर तालुक्यातील ३३ गावांवर होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इको सेन्सिटिव्ह झोन लागू झाल्यास संबंधित गावांतील नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर विविध निर्बंध येण्याची शक्यता असल्याचे ते म्हणाले. या संदर्भात आपण केंद्र सरकारकडे ई-मेलद्वारे हरकत नोंदवली असून, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनाही याबाबत माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले.

आपण विधानसभा अध्यक्ष असताना इकोझोनचा प्रश्न पुढे आला होता. त्यावेळी आपण तो थांबविला होता, असेही वळसे पाटील यांनी सांगितले.

**प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींच्या व्यवहारांची चौकशीची मागणी**

तालुक्यात प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींच्या व्यवहारांबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झाल्याचेही वळसे पाटील यांनी सांगितले. मृत व्यक्तींना जिवंत दाखवून खरेदीखत करण्यात आल्याच्या तक्रारी, तसेच एक कोटी रुपयांची जमीन केवळ दहा लाख रुपयांना खरेदी केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा त्यांनी केला.

या सर्व प्रकरणांची पुढील काळात निश्चित दखल घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. संबंधित व्यवहारांची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सूचित केले.

**सावकारकीच्या तक्रारींचीही दखल घेणार**

तालुक्यात काही व्यक्तींकडून सावकारकी केली जात असल्याच्या तक्रारी आणि निवेदने प्राप्त झाल्याचे वळसे पाटील यांनी सांगितले. या तक्रारींचीही दखल घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दूध भेसळ प्रकरणातील आरोप-प्रत्यारोपांपासून डिंभे-माणिकडोह बोगदा, पश्चिम घाट इकोझोन, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी आणि सावकारकीपर्यंत विविध स्थानिक प्रश्नांवर वळसे पाटील यांनी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली.

## सारांश वृत्त

### पावसाचा कहर! चारधाम यात्रा स्थगित; उत्तर प्रदेश-उत्तराखंडमध्ये रेड अलर्ट, अतिवृष्टीचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशाच्या उत्तर भागात पावसाने पुन्हा जोर धरला असून, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने अर्थात आयएमडीने दोन्ही राज्यांतील अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला असून, काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार पावसामुळे चारधाम यात्रेवरही परिणाम झाला असून, यात्रेची हालचाल सुरक्षेच्या कारणास्तव स्थगित करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशात पुढील दोन दिवस पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. राज्यातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस होण्याचा इशाराही आयएमडीने दिला आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनासमोर पूरस्थिती, रस्ते वाहतूक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचे मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

उत्तराखंडमध्ये परिस्थिती आणखी संवेदनशील आहे. शनिवार, २६ सप्टेंबर रोजी बागेश्वर, पिथौरागढ, चंपावत, नैनीताल आणि उधमसिंह नगर या जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे. डेहराडून, पौडी, रुद्रप्रयाग, चमोली आणि अल्मोरा येथे ऑरेंज अलर्ट, तर हरिद्वार, उत्तरकाशी आणि टिहरी येथे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

रविवार, २७ सप्टेंबर रोजी डेहराडून, टिहरी, पौडी आणि हरिद्वारसाठी रेड अलर्ट कायम ठेवण्यात आला आहे. उत्तरकाशी, चमोली, नैनीताल आणि रुद्रप्रयागला ऑरेंज अलर्ट, तर बागेश्वर, अल्मोरा, चंपावत, उधमसिंह नगर आणि पिथौरागढला यलो अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, दिल्लीमध्येही शनिवारी ढगाळ वातावरण असून काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे. आयएमडीने यलो अलर्ट जारी केला आहे.

# टाटा वादाने उद्योगविश्व हादरले; भागधारकांच्या हक्कांसाठी कंपन्यांची धावपळ सुरू

### टाटा सन्समधील सत्तासंघर्षानंतर उद्योगसमूहांकडून भागधारक करार, व्हेटो अधिकार आणि संचालक मंडळातील नियंत्रणाची फेरतपासणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

देशातील सर्वात प्रतिष्ठित उद्योगसमूहांपैकी एक असलेल्या टाटा समूहातील संचालक मंडळाच्या संघर्षाचे पडसाद आता संपूर्ण भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात उमटू लागले आहेत. टाटा सन्समधील नियंत्रण आणि अधिकारांवरून निर्माण झालेल्या वादानंतर संस्थापक, गुंतवणूकदार आणि कंपन्या आपल्या भागधारक करारांमधील तरतुदी तपासून पाहत असून, भविष्यात अशा प्रकारचा सत्तासंघर्ष निर्माण झाल्यास भागधारकांचे अधिकार अधिक स्पष्टपणे सुरक्षित करता येतील का, यावर कायदेतज्ज्ञ आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्स तज्ज्ञांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, या वादामुळे कंपन्यांकडून 'व्हेटो राइट्स', महत्त्वाच्या निर्णयांवरील संमतीची अट आणि 'ॲफर्मेटिव्ह व्होटिंग क्लॉज' यांचा फेरआढावा घेतला जात आहे.

म्हणजेच, कंपनीतील एखादा मोठा निर्णय घेण्यासाठी विशिष्ट भागधारकाची किंवा समूहाची पूर्वसंमती आवश्यक आहे का, याकडे आता अधिक गांभीर्याने पाहिले जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य टाटा सन्सच्या मालकी आणि संचालक मंडळाच्या रचनेतूनही स्पष्ट होते. टाटा ट्रस्ट्सकडे टाटा सन्समधील सुमारे ६६ टक्के मालकी आहे; मात्र सहा संचालकांपैकी केवळ दोन संचालक जागांवर त्यांचे प्रतिनिधित्व असल्याचे रॉयटर्सने नमूद केले आहे. त्यामुळे मालकीचे प्रमाण आणि प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेवरील प्रभाव यातील अंतर हा कॉर्पोरेट गव्हर्नन्सचा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे.

१५८ वर्षांचा टाटा समूह शंभरहून अधिक देशांत कार्यरत आहे. एअर इंडिया, टेटली, जग्वार लँड रोव्हर यांसारख्या व्यवसायांपासून स्टारबक्स, झारा आणि टेस्ला-ॲपलसाठीच्या घटक उत्पादनापर्यंत त्याचा विस्तार आहे.

## तरंग शक्तीसाठी फ्रान्सची हवाई ताकद जोधपूरमध्ये; चार राफेलसह नऊ लष्करी विमानांचे आगमन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी



भारतात आयोजित करण्यात येणाऱ्या बहुराष्ट्रीय हवाई सराव 'तरंग शक्ती'च्या दुसऱ्या आवृत्तीसाठी फ्रान्सने आपली हवाई ताकद जोधपूरमध्ये तैनात केली आहे. फ्रेंच हवाई आणि अंतराळ दलाने 'मिशन पेगास २६' अंतर्गत चार राफेल एफ४ लढाऊ विमाने, तीन ए३३० एमआरटीटी फिनिक्स इंधनवाहू विमाने आणि दोन ए४००एम ॲटलस मालवाहू विमाने भारतात पाठवली आहेत. या तैनातीमुळे भारत आणि फ्रान्स यांच्यातील संरक्षण सहकार्याला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे.

२५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री जाहीर झालेल्या माहितीनुसार, फ्रान्सची एकूण नऊ लष्करी विमाने या मोहिमेचा भाग म्हणून जोधपूरमध्ये दाखल झाली आहेत. यामध्ये अत्याधुनिक राफेल एफ४ लढाऊ विमानांचा समावेश असून, हवाई युद्धातील क्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने या विमानांना महत्त्व आहे. या तैनातीतील ए३३० एमआरटीटी फिनिक्स विमानांचा उपयोग हवेतच इतर विमानांना इंधन भरण्यासाठी तसेच सैनिक आणि साहित्याच्या वाहतुकीसाठी केला जातो. तर ए४००एम ॲटलस ही विमाने अवजड लष्करी सामग्री आणि सैनिकांच्या वाहतुकीसाठी वापरली जातात.

मात्र, या सरावाचे महत्त्व केवळ विमानांच्या संख्येपुरते मर्यादित नाही. विविध देशांच्या हवाई दलांमध्ये समन्वय, संयुक्त मोहिमांचे नियोजन आणि प्रत्यक्ष परिस्थितीत कार्यक्षमतेची चाचणी घेणे, हे अशा सरावांचे प्रमुख उद्दिष्ट असते. 'तरंग शक्ती'च्या दुसऱ्या आवृत्तीत फ्रान्सचा सहभाग भारताच्या आंतरराष्ट्रीय संरक्षण सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

## कौटुंबिक वाद वर्षानुवर्षे न्यायालयात का रखडावेत? मध्यस्थतेचा मार्ग स्वीकारा, न्या. नागरत्नांचा आग्रह

### कौटुंबिक न्यायालयांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी पर्यायी वाद निवारण यंत्रणेला अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

गुवाहाटी : प्रतिनिधी

कौटुंबिक वादांमध्ये वर्षानुवर्षे चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेमुळे संबंधित कुटुंबावर निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी मध्यस्थता आणि समेटाच्या प्रक्रियेचा अधिक व्यापक वापर करण्याची गरज असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी सांगितले. गुवाहाटी येथे 'कौटुंबिक वादांमध्ये पर्यायी वाद निवारण विरुद्ध न्यायालयीन निर्णयप्रक्रिया : आव्हाने आणि पुढील मार्ग' या विषयावरील दोन दिवसीय प्रादेशिक परिषदेत त्या बोलत होत्या.

न्यायमूर्ती नागरत्ना या सर्वोच्च न्यायालयाच्या कौटुंबिक न्यायालय विषयक समितीच्या अध्यक्ष आहेत. त्यांच्या मते, कौटुंबिक प्रकरणांमध्ये याचिका दाखल झाल्यापासून अंतिम निकालापर्यंत अनेक वर्षे जाऊ शकतात. अशा परिस्थितीत प्रत्येक वादाचा पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेतूनच निकाल लावण्याऐवजी, योग्य प्रकरणांमध्ये मध्यस्थता आणि समेटाचा पर्याय प्रभावी ठरू शकतो.

पर्यायी वाद निवारण म्हणजे न्यायालयाबाहेर वाद सोडवण्याच्या पद्धती. यामध्ये मध्यस्थता आणि समेटाद्वारे संबंधित पक्षांमध्ये संवाद घडवून आणला जातो. न्यायमूर्ती नागरत्नांनी स्पष्ट केले की, या पद्धतींचा उद्देश न्यायालयांशी स्पर्धा करणे नसून न्यायालयीन व्यवस्थेला पूरक ठरणे हा आहे. या प्रक्रियेत तुलनेने वेग, गोपनीयता आणि कमी संघर्षात्मक वातावरण मिळू शकते.

या परिषदेत कौटुंबिक हिंसाचार, विवाह-विच्छेद, मुलांचा ताबा व भेटीचे अधिकार, पोटगी, मालमत्तेचे विभाजन तसेच कौटुंबिक न्यायालयांची मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा यांसारख्या मुद्द्यांवरही चर्चा होत आहे.

कौटुंबिक वादांचा निकाल केवळ कायदेशीर प्रक्रियेचा विषय नसून त्याचा थेट परिणाम मुलांवर आणि संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे जलद, संवेदनशील आणि गोपनीय न्यायासाठी मध्यस्थतेचा योग्य वापर करण्याचा संदेश या परिषदेतून पुढे आला आहे.

## संयुक्त राष्ट्रात भारताचा पाकिस्तानला थेट इशारा; 'दहशतवाद सुरू राहिला तर परिणाम भोगावे लागतील'

### शहबाज शरीफ यांनी काश्मीरचा मुद्दा पुन्हा उपस्थित केल्यानंतर भारताचा राइट ऑफ रिप्लाय; २०२५च्या संघर्षातील अमेरिकेच्या भूमिकेवरील दाव्यांवरही प्रत्युत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

न्यूयॉर्क : वृत्तसंस्था

संयुक्त राष्ट्र महासभेच्या व्यासपीठावर भारत आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी आपल्या भाषणात काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत २०२५ मधील भारत-पाकिस्तान संघर्षात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या कथित वेळेवर हस्तक्षेपाचे श्रेय दिल्यानंतर भारताने राइट ऑफ रिप्लायच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले.

संयुक्त राष्ट्रातील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सचिव पेटल गेहलोत यांनी पाकिस्तानच्या दाव्यांवर टीका करत त्यांना असत्य आणि फसवणुकीवर आधारित असल्याचे म्हटले. पाकिस्तान सरकारवरही त्यांनी थेट निशाणा साधत त्याला पपेट रेजिम असे संबोधले. मात्र, हे भारताच्या राजनैतिक प्रतिनिधीने केलेले आरोप आहेत, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.



काश्मीरच्या मुद्द्यावर भारताने आपली भूमिका पुन्हा स्पष्ट केली. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य आणि अविभक्त भाग असल्याचे भारताने ठामपणे सांगितले. पाकिस्तानकडून हा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सातत्याने उपस्थित केला जात असताना, भारत त्याला द्विपक्षीय आणि दहशतमुक्त वातावरणाच्या चौकटीत पाहतो.

भारताच्या प्रत्युत्तरातील सर्वात कठोर संदेश दहशतवादाबाबत होता. सीमापार दहशतवाद सुरू राहिल्यास त्याचे परिणाम होतील, असा इशारा गेहलोत यांनी दिला. भारताने यापूर्वीही पाकिस्तानकडून दहशतवाद रोखण्यासाठी ठोस आणि पडताळता येतील अशा उपाययोजनांची मागणी केली आहे.

काश्मीरपासून दहशतवादापर्यंतचे मुद्दे पुन्हा संयुक्त राष्ट्रांच्या केंद्रस्थानी आल्याने भारत-पाकिस्तानमधील राजनैतिक संघर्षाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पुन्हा धार आली आहे.

## पीएफची मर्यादा वाढली, पण पगार कापू नका! कंपन्यांना केंद्राचा स्पष्ट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अर्थात ईपीएफओच्या वेतन मर्यादेत मोठी वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यानंतर खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या हातात मिळणाऱ्या पगारावर परिणाम होण्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, या चर्चेला केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाने स्पष्ट उत्तर दिले असून, नव्या नियमाच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वेतनात कपात करू नये, असे निर्देश कंपन्यांना देण्यात आले आहेत.

ईपीएफओची वेतन मर्यादा १५ हजार रुपयांवरून थेट २५ हजार रुपये करण्यात आली आहे. २०१४ नंतर प्रथमच ही मर्यादा वाढवण्यात आली असून, त्याचा फायदा सुमारे एक कोटी नव्या कर्मचाऱ्यांना होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, कंपन्यांनी नवीन वेतनचक्र सुरू होण्याची वाट न पाहता बदलाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले आहेत.

वेतन मर्यादा वाढल्यामुळे कंपन्यांचा कर्मचारी खर्च वाढू शकतो, हे मंत्रालयाने मान्य केले आहे. मात्र, हा अतिरिक्त खर्च कर्मचाऱ्यांच्या पगारातून वसूल करू नये, अशी स्पष्ट भूमिका घेण्यात आली आहे. कायद्यानुसार नियोक्त्याने आपले योगदान योग्य पद्धतीने जमा करणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे अधिक कर्मचारी पीएफच्या कक्षेत येतील. भविष्यातील निवृत्ती बचत, व्याज, पेन्शन आणि विमा संरक्षणाचा लाभही संबंधित कर्मचाऱ्यांना मिळू शकतो.

रोजगार योजनेतील नव्या कर्मचाऱ्यांसाठीच्या तीन हजार रुपयांच्या मदतीचा वापर करून कंपन्यांना वाढलेल्या खर्चाचा काही भार कमी करता येईल, असेही मंत्रालयाने सुचवले आहे.

## बांधावर पाहणी, मदतीचे आश्वासन; पण शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत कधी? बीडमध्ये सुनेत्रा पवारांचा दौरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बीड : प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्याने खरीप पिके संकटात सापडलेल्या बीड जिल्ह्यात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील गावांना भेट देत त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची स्थिती जाणून घेतली. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली असली, तरी आता शेतकऱ्यांचे लक्ष केवळ आश्वासनांकडे नाही, तर प्रत्यक्ष मदतीकडे लागले आहे.

राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून, त्यात बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांचा समावेश आहे. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी ७४ टक्के तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.

माजलगाव तालुक्यातील माळी पारगाव, वारोळा, धर्मेवाडी तसेच गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे पाहणी करताना सुनेत्रा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. माळी पारगाव येथील पद्माकर शिंदे यांच्या शेतातील नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाचीही त्यांनी पाहणी केली.

मात्र, दुष्काळ जाहीर झाला असला तरी पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष मदत पंचनामे आणि मूल्यांकनानंतर स्वतंत्र शासन निर्णयाने निश्चित होणार आहे. त्यामुळे सरकारच्या घोषणेपासून शेतकऱ्यांच्या खात्यात मदत पोहोचेपर्यंतची प्रक्रिया आता निर्णायक ठरणार आहे.

कर्जपुनर्गठन, महसूल व वीजबिलातील सवलती, रोजगार हमीची कामे, पाणी आणि चारा व्यवस्थेसह विविध उपाययोजना जाहीर झाल्या आहेत. मात्र बीडमधील उद्ध्वस्त पिकांना प्रत्यक्ष आर्थिक आधार किती, कधी आणि किती वेगाने मिळतो, यावरच सरकारच्या शेतकऱ्यांच्या पाठीशी या भूमिकेची खरी कसोटी लागणार आहे.

## पत्नीच्या आधीच्या विवाहातील मुलाला स्वीकारलं, तर जबाबदारी झटकता येणार नाही; उत्तराखंड उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नैनिताल : वृत्तसंस्था

विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील नातं नसून, काही परिस्थितींमध्ये त्या नात्याशी जोडलेल्या जबाबदाऱ्यांचाही स्वीकार असतो, हे अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण निर्णय उत्तराखंड उच्च न्यायालयाने दिला आहे. पत्नीच्या आधीच्या विवाहातील मुलाला विवाहाच्या वेळी पूर्ण माहिती असूनही कुटुंबाचा सदस्य म्हणून स्वीकारल्यानंतर, केवळ तो आपला जैविक मुलगा नाही, या कारणावरून पती नंतर त्याच्या देखभालीची जबाबदारी झटकू शकत नाही, असे न्यायमूर्ती आलोक महरा यांनी स्पष्ट केले.

हे प्रकरण २०१३ मधील विवाहाशी संबंधित आहे. महिलेचा यापूर्वी विवाह झाला होता आणि तिला त्या विवाहातून एक मुलगा होता. दुसऱ्या विवाहाच्या वेळी संबंधित पुरुषाला मुलाच्या अस्तित्वाची पूर्ण माहिती होती. विवाहानंतर हा मुलगा त्यांच्यासोबतच राहणार असल्याचीही माहिती आणि समजूत होती. मात्र, पुढे देखभालीच्या प्रकरणात या पुरुषाने आपण मुलाचा जैविक पिता नसल्याचा आधार घेत त्याच्यासाठी देखभाल भत्ता देण्यास विरोध केला. हरिद्वार कौटुंबिक न्यायालयानेही सुरुवातीला पत्नीला ८ हजार रुपये आणि अल्पवयीन मुलीला ६ हजार रुपये मासिक देखभाल भत्ता मंजूर केला होता; मात्र पत्नीच्या आधीच्या विवाहातील मुलाचा दावा जैविक पिता नसल्याच्या कारणावरून नाकारला होता. या निर्णयावर उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण हस्तक्षेप केला. न्यायमूर्ती आलोक महरा यांनी स्पष्ट केले की, संबंधित पुरुषाने मुलाच्या अस्तित्वाची पूर्ण माहिती असतानाही विवाह केला आणि त्याला वैवाहिक कुटुंबाचा सदस्य म्हणून स्वीकारले. अशा परिस्थितीत नंतर केवळ जैविक नातं नसल्याचा आधार घेऊन त्याच्यावरील देखभालीची जबाबदारी नाकारता येणार नाही. न्यायालयाने याला विवाहाच्या वेळी स्वेच्छेने स्वीकारलेली जबाबदारी मानली.

या प्रकरणात पतीच्या उत्पन्नाचाही न्यायालयाने विचार केला. नोव्हेंबर २०२५च्या वेतनपत्रकानुसार त्याचे एकूण मासिक वेतन २ लाख १ हजार ८४३ रुपये, तर कपातीनंतरचे वेतन १ लाख ६ हजार ६५४ रुपये होते. उपलब्ध आर्थिक कागदपत्रांचा विचार केल्यानंतर न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाने ठरवलेली रक्कम अपुरी असल्याचे नमूद केले. पत्नीचा देखभाल भत्ता ८ हजारांवरून १० हजार रुपये, अल्पवयीन मुलीचा ६ हजारांवरून ३० हजार रुपये करण्यात आला. पत्नीच्या आधीच्या विवाहातील मुलाला अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून तो सज्ञान होईपर्यंत दरमहा १० हजार रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले.

पत्नीला तिच्या पूर्वाश्रमीच्या पतीकडून मिळालेल्या ५ लाख रुपयांच्या समझोत्याचा आधार घेतही संबंधित पुरुषाने जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र, आधीच्या पतीसोबत झालेल्या समझोत्यामुळे नंतरच्या वैवाहिक नात्यात स्वेच्छेने स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या संपुष्टात येत नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या निर्णयाचा केंद्रबिंदू केवळ देखभाल भत्त्याची रक्कम नसून, विवाहाच्या वेळी एखाद्या मुलाला कुटुंबाचा भाग म्हणून स्वीकारल्यानंतर निर्माण होणाऱ्या जबाबदारीकडे नंतर पाठ फिरवता येते का, हा प्रश्न आहे. उत्तराखंड उच्च न्यायालयाने या प्रकरणातील परिस्थितीच्या आधारे त्यावर स्पष्ट भूमिका नोंदवली आहे.